बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

## जिल्ह्यात महसूल सप्ताह

बीड : महसूल विभागातर्फे राज्यात ०१ ते ०७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा होणार असून बीड जिल्ह्यातही या अंतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या विविध सहा योजनाबाबत जनतेमध्ये जनजागृती आणि त्यांचे समस्या सोडवल्या जातील. एक ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्र शासन महसूल दिन म्हणून साजरा करते यानिमित्ताने महसूल विभागाशी निगडित जनतेच्या विविध अडीअडचणींना समजून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी महसूल दिनाचे औचित्य साधून दिनांक ०१ ते ०७ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून पात्र नागरिकांनी याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, यासाठी महसूल सप्ताह साजरा होणार आहे. ०१ ऑगस्टला जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यालयात महसूल दिनाच्या शुभारंभ होईल.

बीड | मंगळवार, दि.३०जुलै २०२४ | वर्ष४रे | अंक१ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

**तो कोण गुत्तेदार त्याला ८० लाखाच्या कामाचे वाटप?**

## उंची कमी पण पराक्रम मोठे






### इतरांना नियम सांगणारे स्वतः गध्यासारखे वागू लागले • झेडपी निवडणूक नसल्याने अधिकाऱ्यांना सुगीचे दिवस • अति सीईओ वासुदेव साळुंखे विरोधात मंत्रालयात तक्रार

**बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषद कोणत्या-न कोणत्या कारणाने सतत चर्चेत असते. सध्या झेडपी निवडणूक झाली नसल्याने काही अधिकाऱ्यांना सुगिचे दिवस आलेले आहेत.त्यामुळे त्यांच्या हावरट खाण्याला परिसीमा उरलेली नाही. कारण नियमात नसतांना अति सीईओ वासुदेव साळुंखे यांनी, निवासस्थान दुरुस्तीमध्ये ८० लाखाचा नियबाह्य खर्च केला आहे. इतरांना नियमांचे डोस देणारे काही गैबांदास अधिकारी स्वतःच गाढवासारखे वागू लागले तर ही बाब खरोखरच कठीण आहे.झेडपीतल्या वासुदेव गैर कारभाराची वंचित कार्यकर्त्याने थेट मंत्रालयात तक्रार दिली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याचे बूड चांगलेच शेकले जाणार आहे. त्यामुळे नेमकी काय कारवाई होईल याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.**



अति.सीईओ वासुदेव साळुंखे यांनी अभिलेख कक्षात जास्तीचे दराने खरेदी केल्याची तक्रार केली होती. त्यानंतर इमारत दुरुस्तीच्या नावाखाली खैरात वाटल्यासारखे ७० ते ८० लाखाचे कामांना प्रशासकीय मान्यता देत कामे केल्याचे दाखवले आहे. परंतु सदरील कामे पूर्ण केली आहेत का? याची चौकशी होणे अपेक्षित आहे. एक भ्रष्ट अधिकाऱ्यामुळे पूर्ण प्रशासनाला डाग लागतो. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांची बदली करणे महत्वाचे आहे.
–अजय सरवदे,वंचित बहुजन आघाडी, बीड

**सगळे एकाच माळेचे मनी**

कोणत्याही कार्यालयात जा, तिथे बोटावर मोजण्या इतकेच चांगले अधिकारी दिसतील. बाकी सगळे एकाच माळेचे सारखेच मनी आहेत. सर्वजन मिळून-मिसळून घपला करतात. त्यामुळे अशा लाचखाऊ लोकांना धडा शिकविला पाहिजे. कारण त्यांच्यामुळे पूर्ण प्रशासन बदनाम होत आहे. या लाचखाऊ महाशयांचा रुबाब अतिशय थाटातला असतो. वयाच्या ६० पर्यंत बसायला गाडी,रहायला घर, बरच काही फुकटच असत, असे असतांना दिवसाला चिरीमिरीवर डोळा असतोच. त्यामुळे अशा लाचखाऊ लोकांना साहेब म्हणून त्यांच्या रुबाबात भर टाकणे गरीब आणि सामान्य माणसाने थांबविले पाहिजे. अशा प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहेत.

वंचितचे अजय सरवदे यांनी अति.सीईओ साळुंखे यांची यापूर्वीही तक्रार केलेली होती. त्यामध्ये त्यांनी म्हंटले होते अति.सीईओ वासुदेव साळुंखे यांनी अभिलेख कक्ष जिल्हा परिषद बीडमध्ये अनियमितता केली आहे. त्या तक्रारीनंतर अजय सरवदे यांनी पुन्हा एकदा निवासस्थान दुरुस्ती संदर्भात तक्रार केली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, अति.सीईओ वासुदेव साळुंखे यांनी ७० ते ८० लाख रुपये नियमबाह्य खर्च केलं आहे.

अति.सीईओ यांचे निवासस्थान दुरुस्ती कामात शासन निर्णयाचे उल्लंघन करत अनियमितता केली आहे. या प्रकरणी शासन निर्णयानुसार मार्गदर्शन सूचना अशी आहे की, इमारतीच्या दुरुस्ती कामासाठी इमारतीमध्ये करावयाच्या सर्वप्रकारच्या दुरुस्तीच्या कामांसाठी एकत्रित निविदा बोलाविण्यात येणे अपेक्षित होते. तसेच एका इमारतीच्या परिसरातील विविध कामाचे एकत्रित टेंडर करावे असे स्पष्ट निर्देश शासन निर्णयात आहेत. परंतू अति.सीईओ वासुदेव साळुंखे यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन करत एकाच परिसरातील विविध कामास स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देत विना टेंडर कामाचे वाटप केले आहे. संबधित गुत्तेदार यांनी परिसरातील कामे केलीच नाहीत.परंतु अति.सीईओ वासुदेव साळुंखे यांच्या आशीर्वादाने बिले मात्र उचलली जात आहेत. तसेच या दुरुस्तीच्या कामास होणार खर्च कोणत्या हेडखाली केला आहे याची माहिती दडवून ठेवली आहे. त्यामुळे यासर्वांची सखोल चौकशी करण्याची मागणी वंचितचे अजय सरवदे यांनी केली आहे.

# तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी

**पंकजाताई मुंडे : एकजुटीची ताकद अशीच कायम ठेवा**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पक्षाने आपल्याला सन्मान व स्वाभिमान दिला आहे. याचा वंचितांच्या कल्याणासाठी उपयोग करू. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकारणाचा पायाच वंचितांचा न्याय करणे अशा पद्धतीचा आहे. ज्यांचा कोणी वाली व वाणी नाही त्यांचा खंबीर आवाज बनण्यासाठीच मी राजकारणात आहे. वंचित, उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठीच माझं आयुष्य समर्पिलेले आहे. पंकजा मुंडे मोठी कधीच नाही, तुम्ही जी जनशक्ती पाठीशी वेळोवेळी उभे करता ती शक्तीच आपले मोठेपण आहे. मला आज तुमच्याकडून एक वचन पाहिजे, तुमच्या लेकीला एक वर्ष द्या, तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी आहे. आपसातील भांडण, तंटे विसरा एकजुट व्हा,

पान २ वर...

### लेक तुमच्यामुळेच मोठी

पंकजा मुंडे कधीच मोठी नव्हती व कधीच मोठी असणार नाही, तुमची माझ्या पाठीशी असलेली ही एकजूट व एकसंघ जनशक्ती हीच सर्वश्रेष्ठ असून याचे ऋण कधीही फिटणार नाही. नुकतीच विधान परिषदेवर पक्षाने मला संधी दिली. सर्वांना समाधान व आनंद वाटला. परंतु व्यक्तीशः पंकजा मुंडेंना काय मिळाले तर पक्षाने मला त्यासाठी पात्र समजले व ही संधी देऊन एक प्रकारे सन्मान व स्वाभिमान दिला.ही सन्मानाची भावनाच प्रत्येकाला ऊर्जा प्रदान करणारी असते. या संधीतून वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देण्याचे ध्येय आपले असून त्यासाठीच आपण राजकारणात असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये मिळणार!

**धनंजय मुंडे : अर्थसंकल्पातील घोषणेनंतर कृषी विभागाचा शासन आदेश जारी**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेप्रमाणे प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय आज कृषी विभागाने घेतला असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.




सन २०२३ मध्ये बहुतांश भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने त्याचबरोबर कापूस व सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र महायुती सरकारने या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची घोषणा लोकसभा निवडणुकीच्या आधीच केली होती. त्याचबरोबर त्याची अधिकृत घोषणा नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पातही करण्यात आली होती. या निर्णयाची कृषी विभागाने कृषिमंत्री धनंजय

पान २ वर...

## लाचखोर मुख्याध्यापक एसीबीने पकडला; आठवड्यातील दुसरी घटना

गेवराई/ पुण्यभूमी प्रतिनिधी

वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देण्यासाठी शिक्षकालाच मुख्याध्यापकाने लाचेची मागणी केली होती. २७०० रुपयाची लाच स्वीकारताना बीड एसीबीने लाचखोर मुख्याध्यापकाला रंगेहात पकडले . या प्रकरणी गेवराई पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून गेवराई पंचायत समितीमध्ये हे आठवड्यातले दुसरे लाचखोरीचे प्रकरण आहे . गेवराई तालुक्यातील मण्यारवाडी येथील



जिल्हा परिषद प्राथमिक शाळाचे मुख्याध्यापक आणि पूर्वाश्रमीचे बीड जि . प . चे आदर्श शिक्षक भारत शेषराव येडे यांना २७०० ची लाच स्वीकारताना जुन्या बसस्टॅन्ड नजीक असलेल्या चहापाणी अमृततुल्य हॉटेलमध्ये २९ जुलै रोजी सोमवारी करण्यात आली . तक्रारदार शिक्षक आहेत . त्यांना चट्टोपाध्याय वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अटी व शर्तीनुसार मान्य केले . संबंधित मुख्याध्यापक आणि गटशिक्षणाधिकारी यांनी वरिष्ठ वेतन श्रेणी आहे किंवा कसे असे पत्र काढले होते . त्यावरून तक्रारदार यांचे वरील वरिष्ठ श्रेणीचे बिल तयार करून ते बिल गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती व जिल्हा परिषद बीड

पान २ वर...

# आरटीई प्रवेश देण्यास शाळांचा नाकार

**मनोज जाधव : प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर कारवाई करुन मान्यता रद्द करा**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासनाने न्यायालयाच्या आदेशा नंतर आरटीई प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यामध्ये २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड आरटीई प्रवेशासाठी झाली असून यात ४७१ प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र जिल्ह्यातील काही शाळा प्रवेश देण्यास नकार देत असल्यामुळे आरटीई प्रवेश मिळून देखील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. शाळांना तंबी देत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असताना शिक्षण विभाग बघायची भूमिका घेत असून यामुळे पालक हवालदिल झाला आहे. आज सर्व पालक एकत्र येत जिल्हा परिषद येथे मोठी घोषणाबाजी करत आमच्या मुलांना न्याय द्या, आमच्या मुलांना प्रवेश द्या, या घोषणा देत शिक्षणाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवेदन सादर केले. यावेळी न्यायालयाच्या आदेशाने आणि कायद्याने शाळा आणि प्रशासनाला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील, जर का शाळा प्रवेश देणार नसतील तर आरटीई कायद्यानुसार त्या शाळेंवर कारवाई करून त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी

पान २ वर...

# कोमलवाडी-भोजगाव रस्त्याची अत्यंत दुरावस्था!

**समस्या | आ लक्ष्मण पवारांनी लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित?**

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. ४ किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. कोमलवाडी व भोजगाव ही ग्रुप ग्रामपंचायत असून या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामपंचायत भोजगाव येथे असल्यामुळे



ग्रामस्थांना त्याठिकाणी जावं लागतं, सध्या पावसाळा सुरू असल्याने हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात खड्डेच खड्डे पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी कोमलवाडी ते भोजगाव हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, ग्रामपंचायतीच्या कामासाठी, उमापूर येथील बँकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण

पान २ वर...

मागील काही वर्षांपूर्वी कोमलवाडी फाट्यापासून ते कोमलवाडी गावालगत रास्त्याचे अर्धवट डांबरीकरण झालेले आहे. कोमलवाडी ते भोजगाव या रस्त्याची दयनीय दुरवस्था झालेली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सध्या काही मुरुम टाकून नागरिकांना येण्या जाण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. सदरील हा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी आम्ही आतापर्यंत आमदार लक्ष्मण पवार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. यापुढे देखील करणार आहोत. सदरील हा रस्ता डांबरीकरण होणारच आहे. परंतु लवकरात लवकर होण्यासाठी प्रयत्न करणार
– सुर्यकांत धनवडे,उपसरपंच कोमलवाडी

## नशाखोर झोपडपट्टी दादाचा सुळसुळाट?

**गुंडगिरी : केज तालुक्यात पसरले भितीचे वातावरण**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई रस्त्या वरील पिसेगाव फाटा येथे एका व्यापाऱ्यास पाच जणांनी लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करीत सोन्याची चैन,अंगठी असा ७५ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने काढून घेतल्याची घटना घडली आहे.

व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांचे लहाने बंधू व्यापारी ज्ञानेश्वर शिवाजी सुर्यवंशी वय ३८ वर्षे यांचे केज शहरात मुख्य रस्त्यावर श्री व्यंकटेश एजन्सी कृषी मशिनरीचे दुकान आहे.दि. २५ जुलै रोजी रात्री ८-०० वाजता दुकान बंद करून दुचाकीवरून गावाकडे निघाले होते.ते केज - अंबाजोगाई रस्त्यावर पिसेगाव फाटा येथे वळत असताना पिसेगाव फाट्या वर लावलेल्या बॅनरचे पाठीमागे पाच अनोळखी इसम तोंडाला काळ्या रंगाच्या मफलर बांधून उभे होते.त्यातील एका इसमाने पाठीमागून लोखंडी रॉडने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली.दुसऱ्या इसमाने त्याच्या




हातातील लाकुड त्यांच्या दुचाकीच्यापुढच्या चाकात घातले.त्यामुळे ते दुचाकीवरून खालीपडले. त्या पाच जणांमध्येत्यांच्या भावकीतील ओळखीचा रवी दत्तात्रय सुर्यवंशी हा दिसल्याने ते त्यास मीतुला ओळखतो असे म्हणताच रवी सूर्यवंशी याने हातातील कोयत्याने त्यांच्या डोक्यात मारून दुखापत केली.तुला आता जिवच मारून टाकतोअसे म्हणत त्यांच्या पाठीवरील बॅग हिसकावून घेत असताना दुसऱ्या अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीची दोन तोळ्याची

पान २ वर...

# राष्ट्रसंत भगवान बाब महाराजांनी अनिष्ट रुढी प्रथांचे निर्मूलन केले!

## पोनि संजय लोहकरे | परळीत भगवान बाबांची जयंती

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवानबाबांनी अनिष्ट रूढी प्रथांचे निर्मूलन केले असे प्रतिपादन परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची १२८ वी जयंती निमित्ताने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे केले. परळी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित चर्चासत्राचे उद्घाटकीय भाषणात ते बोलत होते . या वेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक ए. तू. कराड, पत्रकार धनंजय अरबुने, संपादक राजेश साबणे, संपादन आत्मलिंग शेटे, संपादक महादेव गित्ते उपस्थित होते.पुढे बोलताना संजय लोहकरे म्हणाले कि, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. यात संत नामदेव,

संत नरहरी महाराज, संत तुकाराम महाराज ,संत सावतामाळी, संत चोखामेळा, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, अशाच संतांच्या शृंखलेत बीड जिल्ह्यातील राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचेही सामाजिक शैक्षणिक कार्य महत्वाची भूमिका बजावली. राष्ट्रसंत भगवान बाबांनी पशुहत्या, अनिष्ट रूढी प्रथांना आळा घातला. कार्यक्रमाचे





मुख्य वक्ते लेखक ए. तु कराड यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचे सामाजिक-शैक्षणिक विचार आणि आजचे वास्तव्य या विषयवार सखोल मार्गदर्शन केले.

या परिसरात मोठ्या प्रमाणात अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक द्वेष, विषमता व गुलामीत राहणाऱ्या लोकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुभावाने राहण्याची शिकवण कीर्तनातून दिली. समाजात मानवतावाद रुजवला. देशात महात्मा बसवेश्वर, छ. शिवाजी महाराज आणि राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची जयंती/ जन्मोत्सव दोन वेळेस होत असल्याचीही त्यांनी माहिती दिली. आज राष्ट्रसंत भगवानबाबांची जयंती आपण तारखे प्रमाणे साजरी करत असल्याचे ते म्हणाले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात दै. अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे म्हणाले कि,राष्ट्रसंत भगवान बाबांनी दऱ्या डोंगरात राहणाऱ्या समाजाला कीर्तनातून प्रबोधन केले. भगवानगडावर बहुजनांचे प्रेरणास्त्रोत विठ्ठल-रुकमाईच्या मूर्तीची स्थापना भगवानबाबांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भगवान साकसमुद्रे यांनी केले. सम्राट गित्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास जेष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, संपादक बाळासाहेब फड, पोलीस विष्णू फड ,विकास वाघमारे, बाबा शेख, श्रीमंत खांडेकर, परमेश्वर मुंडे, अजय फड, हरिभाऊ आगलावे आदींची उपस्थिती होती.

# केतन राठोड यांना तात्काळ निलंबित करा

## रुक्मिणी नागापुरे : बलात्कार प्रकरणातील पिडीतेसह नातेवाईकांना धमक्या



बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील किट्टीअडगाव येथील ९ वीच्या वर्गात शिक्षण घेत घेतलेल्या १४ वर्षीय मुलीवर अतिप्रसंग केलेल्या आरोपींसह यामध्ये आरोपीस मदत करणाऱ्यांनाही सहआरोपी करण्याच्या मागणीसाठी एकल महिला संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड येथे निवेदन देण्यात आले. व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच आरोपींना पाठीशी घालणाऱ्या केतन राठोड व सोनटक्के यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे एकल महिला संघटनेच्या वतीने करण्यात आली.

माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथे काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली असून याकडे मात्र प्रशासकीय यंत्रणा आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप एकल महिला संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. पिडीतेला लवकरात लवकर न्याय देवून आरोपींना पाठीशी घालणारांनाही निलंबित करण्याची मागणी एकल महिला संघटनेच्या रुक्मीनी नागापुरे यांनी केली आहे. यासह मुख्य आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस केतन राठोड व सोनटक्के यांना तात्काळ निलंबित करावे, तर पीडित मुलीच्या कुटुंबाला आरोपी पासून धोका आहे यासाठी पोलीस संरक्षण मिळावे, पीडित मुलीला न्याय देऊन नुकसान भरपाई मिळावी, अतिथी लॉज यांचा परवाना रद्द करावा व हॉटेलच्या मालकाला सहआरोपी करण्यात यावे. यावेळी एकल महिला संघटनाच्या बीड जिल्ह्यातील तारा घोडके, लता सावंत, मोहिनी बाबर, अनिता ढोरमारे, शिल्पा साबळे, मंगल कानडे, रुक्मिणी नागापुरे, प्रजावती जोगदंड, शारदा सोनवणे, उजवला खंडागळे, कौशल्या कळसुले, शिल्पा पंडित, संगिता मेटे, चित्रा पाटील, आशालता पांडे दुर्गा गवळी आदी महिला उपस्थित होत्या.

# बीडमध्ये शुक्रवारी होणार भव्य स्वयंरोजगार मेळावा

## धोरण : डॉ.क्षीरसागर दाम्पत्य तरुणांना उपलब्ध करुन देणार रोजगार







बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी राबविला जात आहे. पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून बीडमध्ये शुक्रवारी (दि.२) भव्य स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नुकतेच आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यापाठोपाठ आता स्वयंरोजगार मेळावा होत आहे. बीड मतदारसंघात व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. या मेळाव्यातून फास्ट फूड, इडली-डोसा विक्री केंद्र, भाजीपाला विक्री, पर्यटन आदी व्यवसायांसाठी ८० ते ९५ टक्के बँक कर्ज उपलब्ध होऊ शकते. यात सबसिडी किंवा व्याज परतावा मिळणार आहे. काही व्यवसायांवर १५ ते ३५ टक्के सबसिडीचा लाभ मिळणार आहे. यासाठी बँकांसह विविध महामंडळे सर्वोतपरी सहकार्य करणार आहेत. दरम्यान, हा स्वयंरोजगार मेळावा शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२) सकाळी १० ते ५ या वेळेत होणार आहे. या दिवसापर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जासाठी व अधिक माहितीसाठी ८२०८९०७७५१, ९९२३८४७६६०, ७३५३०३६१११ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, बीड विधानसभा मतदारसंघातील तरुणांनी स्वयंरोजगार मेळाव्याचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

### बँक अधिकारी, महामंडळ व्यवस्थापकांसोबत बैठक

बीडमध्ये होणाऱ्या स्वयंरोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने शासकीय विश्रामगृहावर जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्राचे महा व्यवस्थापक, सर्व बँकांचे अधिकारी, विविध महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, अधिकारी यांच्यासमवेत डॉ.योगेश क्षीरसागर यांची बैठक पार पडली. यावेळी स्वयंरोजगार मेळाव्यासाठी सर्वोतपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

# ओबीसी आरक्षण महासभेस उपस्थित रहा

## किशोर भोले : गेवराईत पार पडणार आरक्षण सभा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



गेली अनेक वर्ष सातत्याने ओबीसींच्या आरक्षणाचा लढा अँड बाळासाहेब आंबेडकर हे लढत आहेत एस्सी एसटी ओबीसीचे आरक्षण कायम रहावे व मराठ्यांसाठी आरक्षणाचे वेगळे ताठ असावे हि कायम भुमिका अँड बाळासाहेब आंबेडकर मांडत आहेत गेली कित्येक वर्षांपासून आपली राजकीय पोळी साधण्यासाठी सत्ताधारी व विरोधक ओबीसी व मराठा बांधवांमध्ये दिशाभूल करण्याचे काम करत आहेत त्यामुळे मराठा ओबीसी संघर्ष टोकाला गेला आणि अशातच महाराष्ट्र पेटवू नये म्हणून कायम सातत्याने भुमिका घेत आहेत म्हणून एस्सी एसटी ओबीसी व मराठा बांधवांमध्ये जनजागृती होण्यासाठी अँड बाळासाहेब आंबेडकर यांनी एस्सी एसटी ओबीसी आरक्षण बचाव यात्रा महाराष्ट्रातुन सुरू केली आहे यात्रे निमित्त अँड बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्येओबीसी आरक्षण बचावमहासभेचे आयोजन गेवराई शहरात ३१जुलै रोजी सायंकाळी ४:०० वाजता करण्यात आले असून ऐतिहासिक महासभेस गेवराई विधानसभा मतदारसंघातील एस्सी एसटी ओबीसी यानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका महासचिव किशोर भोले यांनी केले आहे.

## जिव्हाळा...



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरातांनी धनंजय मुंडेंची भेट घेवून त्यांच्याप्रकृतीची विचारपूस केली.

# चार हजार आठशे शेतकरीवंचित

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील ई केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांना ई केवाय सी साठी सोमवार( दि २९) पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे सोमवारी दुपारी आपत्ती निवारण विभागाकडून ई केवायसी झालेल्या शेतकऱ्यांचा अहवाल पाठविण्यात येणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने ई केवायसी करणे अनिवार्य आहे

सोयगाव तालुक्यात सण २०२२ -२३ अतिवृष्टीमुळे बाधित एक हजार शंभर व २०२३ -२४ मध्ये खरीप दुष्काळाने बाधित तीन हजार सातशे असे एकुण चार हजार आठशे शेतकरी ई केवाय सी अभावी दोन्ही अनुदानांपासून वंचित आहे चार हजार आठशे शेतकऱ्यांच्या खात्यात इ के वाय सी अभावी चार कोटी पन्नास लक्ष ७९ हजार इतका निधी पडून आहे पोर्टल वर या निधीची रक्कम पडुन असल्याने तातडीने सोमवार दुपारी दोन वाजेपर्यंत ज्या शेतकऱ्यांनि ई केवाय सी ची प्रक्रिया पूर्ण केली त्यांच्या खात्यात या निधीची रक्कम वर्ग करण्यात येईल अशी माहिती तहसीलदार मनीषा मेने यांनी दिली आहे त्यामुळे या वंचित शेतकऱ्यांनी ई केवाय सी करण्यासाठी संबंधित गावात ग्रामपंचायत कार्यालयात त्या शेतकऱ्यांच्या याद्या डकविण्यात आल्या आहे.

# विश्व हॉस्पिटलकडून यज्ञ अविरत सुरु

## उपक्रम : मेंदू,मनका व नसांचे आरोग्य तपासणी शिबिर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर आणि डॉ स्वप्नजा विशाल पिंगळकर यांच्या विश्व न्यूरो स्पाईन सर्जिकल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिहॅबिलिटेशन सेंटर बीडच्या वतीने बीड जिल्ह्यातील गरजूंना च्या सेवेकरिता पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ सचिन महाजन यांचे मेंदू,मनका,नस व मेंदू संबंधित इतर विकारांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरामध्ये जिल्हाभरातील रुग्णांनी प्रचंड प्रतिसाद देऊन संबंधित विकारांची तपासणी करून घेतली. शिबिरामध्ये ब्रेन ट्यूमर, ब्रेन ट्यूमर ची पुनरावृत्ती, मेंदू व पाठीमागील गाठी,पाठीचा ट्यूमर,टीबी ची गाठ, अर्धांगवायू,मेंदूतील रक्तवाहिनी फुगणे, पाठीचा कणा संदर्भातील विकृती, व इतर मनका व मेंदू संदर्भातील सर्व विकार यावर न्यूरोसर्जन डॉ सचिन महाजन आणि न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकरयांनी रुग्णांची तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये जिल्हाभरातील तब्बल २०० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. पुणे-मुंबई-संभाजीनगर या मोठ्या शहरांमध्ये मिळणारा अतिउच्च दर्जाच डॉक्टर आणि उपचार,मार्गदर्शन बीड सारख्या ठिकाणी भेटत असल्याने विश्व हॉस्पिटलचे रुग्णांनी आभार मानले. शिबिरामध्ये मोफत हाडाचे कॅल्शियम तसेच ब्लड शुगर तपासण्याची ही सुविधा होती. इथून पुढेही बीड करांच्या सेवेसाठी न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांचे विश्व हॉस्पिटल वेगवेगळे पॅटर्न आणि वेगवेगळ्या प्रकारचे आरोग्य तपासणी शिबिर घेत राहील असा विश्वास विश्व हॉस्पिटल च्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ स्वप्नजा विशाल पिंगळकर यांनी व्यक्त केला



## कपिल मस्के | नगराध्यक्ष बनसोडांना न्याय म्हणजे फिर्यादीवर अन्यायच!

# वेळप्रसंगी न्यायालयात धाव घेणार!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केजच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोडे यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाला दिलासा असून विनापरवाना बांधकाम केल्या प्रकरणाचा माजी नगरसेवक कपिल मस्के यांचा अर्ज जिल्हाधिकाऱ्यांनी नामंजूर केला आहे.या बाबतची सविस्तर माहिती अशी की,केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई प्रदीप बनसोड या संवैधानिक पदावर म्हणजेच नगराध्यक्षा पदा वर राहून त्यांनी केज शहरातील महात्मा फ ुले नगर येथील त्यांच्या मालकीचे घर नं.३१३१ या घराचा बांधकाम परवाना न घेताच सौ. सीताताई बनसोड या बांधकाम करीतआहेत.सौ.सिताताई प्रदीप बनसोडे यांना अनधिकृत बांधकाम केल्यामुळे महाराष्ट्र नगर परिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम१९६५ चे कलम ४४,४४(ई) नुसार अपात्र घोषित करण्यात यावे.या साठी अपिल दाखल केले होते.नगराध्यक्ष सिता बनसोड या चुकीचे विनापरवानगी घर बांधकाम करत आहेत असे समजताच माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी पुरावे गोळा करण्याचे काम चालू केले याची चाहूल लागताच नगराध्यक्षांनी ते घर दत्तात्रय हंडिबाग यांना नोटरी करून दिले व ते मी केंव्हाच दत्तात्रय हंडिबाग यांना विकले असे दाखवण्यात आले.आता दत्तात्रय हंडिबाग हे कोण हे सगळा तालुका ओळखतो तसेच जे वर्तमान पत्र कधी तरी छापले जाते अश्या वर्तमान पत्रात त्याचे प्रकटन केले जे की कुणाच्या लक्षात येऊ नये.त्यानंतर अपिल केल्या नंतर खोटी नोटरी,वर्तमानपत्रातील प्रकटन अश्या चुकीच्या गोष्टी मुळे निकाल हा नगराध्यक्षाच्या बाजूने लागला.पण मी जी लढाई लढत होतो त्यात नैतिकी माझा विजय झाला आहे.कारण ज्या वार्डाच त्या प्रतिनिधित्व करतात त्यांना व केज शहरातील प्रत्येक नागरिकास माहीत आहे ते घर कोणाचे आहे. त्या मुळे न्याय वगैरे काही झाली नसून जिल्हाधिकारी यांची दिशाभूल केली गेली आहे.तसेच आपल्या नगराध्यक्ष पदाचा पुरेपूर गैरवापर केल्याचे मी पुरावे घेऊनमी पुन्हा आपिलात जाणार किंवा वेळ प्रसंगी न्यायालयात जाणार असे कपिल मस्के म्हणाले आहेत.



# मुंडेंच्या पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया

## आरोग्य : प्रकृती स्थिर,आणखी ४-५ दिवस रुग्णालयात विश्रांती

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया मुंबईतील सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात करण्यात आली आहे. त्यांना अनेक दिवसांपासून पित्त व पोटदुखीचा त्रास होता. मात्र सतत दौरे, सभा, कामकाज यामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष होत होते. मात्र आता पोटदुखीचा त्रास वाढल्याने शस्त्रक्रिया करावी लागली आहे.

मुंबईच्या गिरगाव भागातील सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात मुंडेंच्या पित्ताशयावर (सरश्रश्र लश्ररववशी) डॉ.अमित मायदेव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. बुधवारी (ता.२४) त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर शुक्रवारी (ता.२६) त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. धनंजय मुंडे यांची प्रकृती आता स्थिर असुन, डॉक्टरांनी आणखी चार ते पाच दिवस रुग्णालयातच विश्रांती व पुढील उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मुंडेंच्या तब्येतीची दूरध्वनीवरून विचारपूस करत काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. तसेच भाजप नेत्या आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी खा.डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी देखील रुग्णालयात बंधू धनंजय मुंडे यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# लाओस देशाने जारी केले रामलल्लाचे टपाल तिकीट

## परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची माहिती



**व्हियनतियाने :** दक्षिण पूर्व आशियातील लाओस या देशाने अयोध्येतील श्री रामलल्ला यांच्यावर टपाल तिकीट जारी केले आहे. लाओसने केवळ रामलल्लाचीच नव्हे तर महात्मा बुद्धांचीही टपाल तिकिटे जारी केली आहेत. भारताचे परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी मायक्रोब्लॉगिंग साईट एक्सवर ही माहिती दिली आहे. आता लाओ पीडीआर (लाओ पीपल्स डेमोक्रेटिक रिपब्लिक) हा अयोध्या स्टॅम्प जारी करणारा जगातील पहिला देश ठरला आहे. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर सध्या लाओसच्या दौऱ्यावर आहेत. रामायण आणि बौद्ध धर्माच्या आमच्या सामायिक सांस्कृतिक खजिन्याचा उत्सव साजरा करण्यासाठी एक विशेष तिकीट संच सुरू करण्यात आला आहे.

# कावड यात्रेवर दहशतवादी हल्ल्याचे सावट

वृत्तसंस्था



**मुझफ्फरनगर :** उत्तर प्रदेशातील कावड यात्रेवर दहशतवादी हल्ल्याचे सावट असल्याची माहिती गुप्तचर विभागाकडून प्राप्त झाली आहे. या माहितीनंतर भाविकांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने एटीएसच्या जवानांना सुरक्षेसाठी तैनात केले आहे. कावड यात्रेकरूंच्या सुरक्षेची जबाबदारी एटीएस कमांडोंकडे सोपवण्यात आली आहे. एसएसपी अभिषेक सिंग यांनी परिस्थितीची संवेदनशीलता लक्षात घेऊन कमांडोना सुरक्षेबाबत सतर्क राहण्यास सांगितले. कावड यात्रेबाबत पोलीस प्रशासन सतर्क आहे. त्याचबरोबर यात्रा यशस्वीपणे पार पडावी यासाठी शासन स्तरावरून पूर्ण गांभीर्याने विचार करण्यात येत आहे.

# बंद घराचे कूलूप तोडून दीड लाखांची चोरी

## भरवस्तीतील कपिलेश्वर मंदिरामागील प्रकार

वृत्तसंस्था

**बेळगाव :** कपिलेश्वर मंदिरापाठीमागील एका बंद घराचा कुलूप तोडून सुमारे दीड लाखाचा ऐवज चोरट्यांनी पळविला आहे. शनिवारी दुपारी चोरीचा हा प्रकार उघडकीस आला असून रात्री खडेबाजार पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. संध्या आनंद जालगार यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. शुक्रवार दि. २६ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आपल्या घराला कुलूप लावून संध्या व त्यांचे कुटुंबीय कंग्राळी बुद्रुक येथील आपल्या मुलीकडे गेले होते. शनिवार दि. २७ जुलै रोजी दुपारी १२ वाजता त्या घरी परतल्या. त्यावेळी घराचा दरवाजा उघडा होता. त्यामुळे घरात चोरी झाल्याचे उघडकीस आले.



**तळेगाव ढमढेरे :** विठ्ठलवाडी-सांगवी सांडस हा शिरूर, दौंड व हवेली तालुक्यांना जोडणाऱ्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावरील रस्ता खचल्याने वाहतुकीस धोकादायक बनला आहे. बंधाऱ्यावरील खचलेल्या रस्त्याची त्वरित प्रशासनाने दुरुस्ती करावी, अशी मागणी माजी उपसरपंच दिलीप गवारे व ग्रामस्थांनी केली आहे.



## झोपु योजना संलग्न करण्याच्या निर्णयाचे प्राधिकरणाकडून समर्थन

# झोपु योजनांची मंजुरी रखडली!

वृत्तसंस्था

**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकास नियंत्रण नियमावलीतील इतर तरतुदींसोबत संलग्न करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला आहेत. या योजना संलग्न करताना चटईक्षेत्रफळाचे उल्लंघन झालेले नाही. उलटपक्षी ज्या तरतुदीशी झोपु योजना संलग्न करण्यात आली आहे, त्यानुसारच चटईक्षेत्रफळ वितरित करण्यात आले असून ते योग्य आहे, अशी भूमिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नगर विकास विभागाला लिहिलेल्या पत्रात मांडली आहे. आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांचे कायदेशीर मत सोबत जोडले आहे. अशा १८ योजनांना पालिकेकडून याआधीच अभय मिळाले असले तरी भविष्यात अशा योजना मंजूर करावयाच्या किंवा नाही, याबाबत संदिग्धता असल्यामुळे अनेक योजना प्रतीक्षेत आहेत.

### नगरविकास विभागाच्या हातात निर्णय

झोपु योजनांसाठी विकास नियंत्रण नियमावलीत ३३(१०)अशी तर झोपडीवासीयांच्या पुनर्वसनासाठी संक्रमण सदनिका उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नव्या नियमावलीत ३३(११) ही तरतूद आहे. यासाठी झोपु प्राधिकरण नियोजन यंत्रणा आहे. या दोन तरतुदी वगळल्या तर इतर सर्व तरतुदींसाठी महापालिका नियोजन प्राधिकरण असून यापुढे झोपु प्राधिकरणाने ३३(१२)(ब) (रस्त्यावर असलेले अतिक्रमण वा अडथळे दूर करून संबंधितांना सामावून घेणे) तसेच ३३(१९) (व्यावसायिक वापर केल्यास पाच इतके चटईक्षेत्रफळ) या तरतुदींसोबत झोपु योजना संलग्न करू नयेत तसेच संलग्न केलेल्या योजना रद्द कराव्यात, असे पत्र झोपु प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविले होते. या पत्राबाबत झोपु प्राधिकरणाने नगरविकास विभागाला स्पष्टीकरण करून आपला निर्णय योग्य असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता नगरविकास विभाग काय निर्णय घेते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# आयएएस कोचिंग सेंटरच्या मालक-समन्वयकाला अटक

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली :** दिल्ली आयएएस कोचिंग सेंटर दुर्घटनेत तिन मुलांचा मृत्यू झाला आहे. प्रत्यक्षात ही परवानगी नसतानाही ज्या इमारतीत हा अपघात झाला त्या इमारतीच्या तळघरात बेकायदा कोचिंग सेंटर सुरू होते. परवानगीशिवाय तळघरात वाचनालय सुरू होते, ते कायदेशीर नव्हते. ज्या तळघरात ही घटना घडली ती जागा साठवणुकीसाठी वापरली जात होती, मात्र येथे वाचनालय बांधण्यात आले होते. या तळघरात मुले अभ्यास करायची अशी माहिती समोर येत आहे.

फायर एनओसीनुसार, स्टोरेज म्हणून तळघर बनवण्याची परवानगी देण्यात आली होती. दुसरी पार्किंग म्हणून वापरली जाणार होती. तर तळघरात वाचनालय बांधण्यात आले. वाचनालय उभारून नियमांचे उल्लंघन करण्यात आले, असा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. मात्र, या प्रकरणी कोचिंग सेंटरच्या मालक आणि संयोजकाला दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. BNSच्या कलम १०५,१०६(१),१५२,२९० आणि ३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोचिंग सेंटरचे व्यवस्थापन आणि नागरी संस्थेच्या लोकांचीही चौकशी सुरू आहे. जुन्या राजेंद्र नगर कोचिंग घटनेबद्दल दिल्लीच्या महापौर शैली ओबेरॉय म्हणाल्या, काल एक अतिशय दुःखद घटना घडली.

## दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूवर प्रियांका गांधी संतापल्या!

**नवी दिल्ली:** दिल्लीतील जुने राजेंद्र नगर येथील कोचिंग सेंटरच्या तळघरात बुडून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. या अपघाताबद्दल दुःख व्यक्त करत त्यांनी' वर एक पोस्ट लिहिली. कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी भरल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना हृदयद्रावक आहे. मी देवाकडे त्या तीन मृत विद्यार्थ्यांसाठी प्रार्थना करते. या मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांसाठी प्रार्थना करते. अलीकडेच एका विद्यार्थ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. पटेल नगरमध्ये दूरवरच्या ठिकाणाहून येथे आलेल्या मुलांचे आयुष्य त्यांच्यापासून हिरावून घेतले जात आहे.

# आसामच्या तरुणीची दिल्लीत हत्या

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** दिल्लीतील द्वारका येथे शनिवारी एका २१ वर्षीय तरुणीची हत्या करण्यात आली. ही महिला जिम ट्रेनर होती. एका तरुणाने तरुणीची हत्या तिच्या घरी जाऊन केली. शनिवारी संध्याकाळी सेक्टर-२३ मधील पोचनपूर परिसरात ही घटना घडली. हा खून तिच्या ओळखीच्या तरुणाने केला असून त्याला पोलिसांनी घटनास्थळावरून अटक केली आहे. मारामारीत आरोपीलाही दुखापत झाली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

माहिती देताना एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आसाममधील छबिला बच्चिया सिलचर येथील रहिवासी असलेल्या स्नेहा नाथ चौधरी आणि आरोपी राज एकमेकांना ओळखत होते. नुकताच त्यांच्यात काही वाद झाला. शनिवारी सायंकाळी आरोपीने त्याच्या घरी जाऊन तिच्यावर चाकूने हल्ला केला. महिलेसोबत झालेल्या भांडणात राजच्या हातालाही दुखापत झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांना चौधरी बेशुद्ध अवस्थेत जमिनीवर पडलेली दिसली. घटनास्थळावरून राजलाही जखमी अवस्थेत पकडण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. शनिवारी सकाळी ७ वाजता पोलिसांना माहिती मिळाली की, पोचनपूर गावात राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणीवर एक तरुण अत्याचार करत आहे. लोकांनी त्या तरुणाला खोलीत बंद केले आहे. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि खोली उघडली. खोलीत मुलगी रक्ताच्या थारोळ्यात सापडली.

# बुडालेल्या जहाजात सापडला मद्याचा साठा

### शॅम्पेन प्रेमींमध्ये उत्साह निर्माण

वृत्तसंस्था



**वॉर्सा :** पोलिश डायव्हर्सच्या टीमने गेल्या आठवड्यात त्यांच्या आयुष्यात प्रथमच आगळा वेगळा शोध लावला १९व्या शतकातील बुडालेल्या जहाजामध्ये अनेक किंमती वस्तूंसह शॅम्पेनच्या शेकडो न उघडलेल्या बाटल्यांचा समावेश होता. खाजगी डायव्हिंग ग्रुप, बाल्टिकटेक, स्वीडिश किनाऱ्यावर बाल्टिक समुद्राचा शोध घेत होता जेव्हा त्यांनी सुरुवातीला सोनार प्रतिमा सामान्य मासेमारी जहाज म्हणून नाकारली. तथापि गोताखोरांच्या एका जोडीने अधिक तपास करण्याचा निर्णय घेतला आणि ते पाण्यात जवळजवळ दोन तास गायब झाले.

तेव्हा त्यांना या बुडालेल्या जहाजात खनिज पाणी आणि आश्चर्यकारक संख्येने शॅम्पेनच्या बाटल्या सापडल्या मिनरल वॉटर ब्रँड, सेल्टर्स, विशेषतः मनोरंजक आहे कारण तो एकेकाळी शाही अमृत मानला जात होता आणि आजही तयार केला जातो. शॅम्पेनचा ब्रँड एक गूढ राहिला असला तरी, गोताखोरांचा असा विश्वास आहे की कदाचित ते स्टॉकहोम किंवा सेंट पीटर्सबर्गच्या शाही दरबाराच्या टेबलसाठी निश्चित केले गेले असावे. टीम लीडर टॉमाझ स्टाचुरा यांनी या शोधाबद्दल आश्चर्य व्यक्त केले आणि असे म्हटले की, मी ४० वर्षांपासून डायव्हिंग करत आहे, आणि अनेकदा असे घडते की आम्हाला एका बाटलीत एक किंवा दोन बाटली सापडतात, परंतु इतका माल शोधणे माझ्यासाठी पहिले आहे.'

# उत्तर कॅलिफोर्नियातील वणवा विझवण्यासाठीचे प्रयत्न सुरूच!



**कॅलिफोर्निया :** कॅलिफोर्नियाच्या उत्तरेकडील भागातल्या जंगलात लागलेल्या आगीवर अजूनही नियंत्रण मिळवले जाऊ शकलेले नाही. या वणव्यामध्ये किमान १३० घरे जळून खाक झाली आहेत आणि हजारो जणांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागलेला आहे. कॅलिफोर्नियाची राजधानी सॅक्रॅमेंटोच्या उत्तरेकडील चिकोजवळ बुधवारी दुपारी लागलेली ही आग झपाट्याने ६६० चौरस किलोमीटरहून अधिक भागात पसरली आहे. ही आग जाळपोळीच्या प्रयत्नामुळे लागल्याचा अधिकाऱ्यांना संशय असून ४२ वर्षीय व्यक्तीला जाणीवपूर्वक आग लावल्याच्या संशयावरून अटक करण्यात आली आहे.

# अमरनाथ यात्रेने मोडला गेल्या वर्षीचा विक्रम

### ४ लाखांहून अधिक भाविकांचे दर्शन

वृत्तसंस्था



**अमरनाथ :** यंदाच्या अमरनाथ यात्रेला २९ जूनपासून सुरुवात झाली आहे. या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या संख्येने गेल्या वर्षीचा विक्रम मोडला आहे. श्री अमरनाथजी श्राइन बोर्डच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, २९ जूनपासून यात्रा सुरू झाल्यापासून, गेल्या २९ दिवसांत ४.५१ लाखांहून अधिक भाविकांनी पवित्र गुहेला भेट दिली असून, गेल्या वर्षीच्या यात्रेचा विक्रम मोडला आहे. मागील वर्षी संपूर्ण यात्रा कालावधीत ४.४५ लाख भाविकांनी गुहा मंदिराला भेट दिली होती.

शनिवारी सुमारे ८,००० यात्रेकरूंनी पवित्र गुहेला भेट दिली, तर रविवारी १,६७७ यात्रेकरूंचा आणखी एक जथ्था जम्मूच्या भगवती नगर यात्री निवास येथून घाटीसाठी रवाना झाला. २९ जूनपासून यात्रा सुरू झाल्यापासून घाटीला भेट देणाऱ्या यात्रेकरूंची ही सर्वात कमी संख्या आहे. यापैकी ४०८ प्रवासी २४ वाहनांच्या ताफ्यात पहाटे ३.३५ वाजता उत्तर काश्मीरमधील बालटाल बेस कॅम्पसाठी रवाना झाले. १,२६९ प्रवाशांचा दुसरा ताफा ४३ वाहनांमध्ये दक्षिण काश्मीरमधील नुनवान (पहलगाम) बेस कॅम्पसाठी रवाना झाला. सीएपीएफ आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या असाधारण सुरक्षा व्यवस्थेमुळे या वर्षी ही यात्रा शांततेत आणि सुरळीतपणे सुरू आहे.

# मंडेलांशी संबंधित स्थळे जागतिक वारसा यादीत

## युनेस्कोकडून गौरव, दक्षिण आफ्रिकेत जल्लोष




**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेच्या महापुरुषांपैकी एक आणि मुक्तिसंग्रामाचे प्रणेते नेल्सन मंडेला यांच्याशी संबंधित अनेक ऐतिहासिक स्थळांचा आता युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. भारतात झालेल्या ४६ व्या अधिवेशनात जागतिक वारसा समितीने याची घोषणा करताच दक्षिण आफ्रिकेच्या शिष्टमंडळातील सर्व सदस्यांनी जल्लोष सुरू केला. आफ्रिकन देशाने मंडेलांशी संबंधित स्थळांबाबत नामांकन सादर केल्यानंतर इटली, दक्षिण कोरिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, जपानसह अनेक देशांनी नामांकनाला पाठिंबा दिला.

## गोव्यात भात उत्पादनात ९,४६२ मेट्रिक टनांनी वाढ

**पणजी :** राज्यातील भात उत्पादनात २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये ९,४६२ मेट्रिक टनांनी वाढ झाली. परंतु, तिसवाडी, सत्तरी आणि धारबांदोडा या तीन तालुक्यांतील भात उत्पादनात घट झाली आहे. आमदार व्हेंझी व्हिएगस यांनी विधानसभेत विचारलेल्या लेखी प्रश्नाला कृषीमंत्री रवी नाईक यांनी दिलेल्या उत्तरातून ही माहिती समोर आली आहे.

# पुणे जिल्हा : तळेगावात ३०० जनावरांवर उपचार

### जनावर जंतू निर्मूलन कार्यक्रम

वृत्तसंस्था

**पुणे :** तळेगाव ढमढेरे येथे पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे संचालक ॲड स्वप्नील ढमढेरे यांच्या वतीने अजित पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पशुवैद्यकीय आरोग्य शिबिरांतर्गत 'जनावर जंतू निर्मूलन' कार्यक्रम पार पडला. यावेळी शिबिरात ३०० जनावरांवर उपचार करण्यात आले. तळेगाव ढमढेरे येथे आयोजित शिबिरात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.



**ठाणे :** दोन महिने कमाईविना बैठे असलेले मच्छीमार बांधव १ ऑगस्ट पासून समुद्रात होड्या लोटण्याच्या तयारीत असून होड्यांच्या डागडुजीसह अन्य बारीक सारीक कामे पूर्ण करण्याच्या कामी समुद्रकिनाऱ्यावर मच्छीमारांची लगबग सुरू झाली आहे. परंतु समुद्रात वादळी वाऱ्याचा अडसर असल्याने कोळी बांधव चिंतेत सापडले आहेत.

# 25 रुपयाचे लोणचे पडले 35 हजाराला!

### ग्राहक न्यायालयाचा रेस्टॉरंटला दणका



**तमिळनाडू :** फूड पार्सलमधून लोणचं न देणे हे रेस्टॉरंट मालकाचा चांगलच भोवले. या निष्काळजीपणाची ग्राहक न्यायालयाने गंभीर दखल घेत रेस्टॉरंट मालकाला तब्बल ३५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तमिळनाडू राज्यातील विल्लुपुरम जिल्ह्यातील आरोग्यसामी यांच्या चुलत भावाची २८ नोव्हेंबर २०२२ रोजी पहिली पुण्यतिथी होती. यानिमित्त त्यांनी एका रेस्टॉरंटमध्ये २५ शाकाहारी थाळांच्या फूड पार्सलची ऑर्डर दिली होती.

# मुंबईतील नागरिकांना स्वाईन फ्लूचा विळखा

वृत्तसंस्था

**मुंबई :** पावसाळ्यात डेंग्यू, हिवतापाबरोबरच स्वाईन फ्लूच्या रुग्ण वाढू लागले असून मुंबईत खासगी रुग्णालयांत दररोज साधारणपणे २० ते २५ रुग्ण स्वाईन फ्लूचे आढळून येत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे मुंबईकरांभोवती स्वाईन फ्लूचा विळखा घट्ट होत असल्याचे दिसत आहे. मुंबई महानगरपालिकेकडून पावसाळी आजारांना प्रतिबंध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. हिवताप व डेंग्यूच्या

मुंबई महानगरपालिकेने पावसाळी आजारांबाबत १६ जुलै रोजी जाहीर केलेल्या अहवालानुसार मुंबईत स्वाईन फ्लूचे ५३ रुग्ण सापडले होते. ही संख्या तुलनेने कमी वाटत असली तरी मुंबईतील अनेक खासगी रुग्णालये व दवाखान्यांमध्ये स्वाईन फ्लूची लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

### स्वाईन फ्लूच्या विषाणूमध्ये बदल?

मुंबईत तापाचे रुग्ण वाढत आहेत. मात्र त्यातील २० ते २५ रुग्णांमध्ये स्वाईन फ्लू सदृश लक्षणे दिसून येत आहेत. या रुग्णांना स्वाईन फ्लूची तपासणी करण्यास सांगण्यात येत आहे. दरवर्षी आजारांच्या विषाणूंच्या गुणसूत्रांमध्ये काही प्रमाणात बदल होऊन त्यांचे उत्परिवर्तन होते. यातील नवीन विषाणू हे सौम्य किंवा घातक असण्याची शक्यता असते. सौम्य विषाणू असल्यास त्याचा फारसा परिणाम जाणवत नाही.

### रोज २० ते २५ रुग्णांची नोंद



रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यापाठोपाठ आता मुंबईमध्ये स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे.

## ऐतिहासिक पुणे रेल्वे स्थानकाचे शंभरीत पदार्पण

**पुणे :** ऐतिहासिक वास्तू असलेली आणि नेहमी गर्दीने भरलेले पुणे रेल्वे स्थानक मागील ९९ वर्षांपासून प्रवाशांच्या सेवेसाठी अभिमानाने सज्ज आहे. दि. २७ जुलै रोजी या स्थानकाने शंभराव्या वर्षात पदार्पण केले. मध्य रेल्वेतील पुणे विभागात असलेले एतिहासिक पुणे रेल्वे स्थानकाचे पहिले डिझाइन १९१५ मध्ये तयार झाले. या वास्तूचे काम पी. विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली १९२२ मध्ये सुरू झाले.

# अण्णाभाऊंच्या लेकरांनो तुम्हाला मानलं पाहीजे!

वर्गणीतून दहा जेसीबी लावल्या अन् बिंदुसरा स्वच्छ केली • साहित्य सम्राट गौरव महोत्सवात विविध उपक्रम • अजिंक्य चांदणे यांच्या संकल्पनेतून राबणार कार्यक्रम • बीड नगर परिषद फक्त निधी हडप करायलाच का?






बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहराच्या सौंदर्यात भर टाकणारी बिंदुसरा नदी शहराच्या मधोमधून गेली आहे.परंतू नदीत वाढलेली झाडे-झुडपे, नदीशेजारी टाकलेला कचरा आणि लोकांनी केलेले अतिक्रमण यामुळे बिंदुसरा नदी आहे की, ओढा असा प्रश्न पडतो. बिंदूसरेच्या नामशेष होण्याला बीड नगर परिषद कारणीभूत आहे. कारण बिंदुसरा नदीला कोट्यवधींचा निधी येवूनही बिंदूसरेचा कोंडलेला स्वास मात्र मोकळा झाला नाही. त्यामुळे बिंदुसरा नदीची ही अवस्था पाहून साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे यांनी जयंती वर्गणीतून दहा जेसीबीद्वारे बिंदुसरेच्या दोन्ही बाजूस एक किलोमीटरचे नदीपात्र स्वच्छ करुन घेतले आहे. त्यामुळे साहित्यसम्राट गौरव महोत्सवाने एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळेच अण्णाभाऊंच्या या लेकरांना खरंच मानलं पाहिजे असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

बीडमध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाला सोमवार (दि.२९) जुलै रोजी सुरुवात झाली. हा महोत्सव १ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम राबवून पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सोमवारी दहा जेसीबीच्या साह्याने बिंदुसरा नदीपात्र स्वच्छ करुन या महोत्सवाला सुरुवात झाली.यावेळी जयंती समितीच्या अध्यक्षा सुशिला मोराळे,समन्वयक अजिंक्य चांदणे, अमृत सारडा, कल्याण आखाडे, शेख निजाम,गणेश वाघमारे, रामसिंग टाक, शंकर विठकर, सुभाष लोणके, सतीश विठकर,अमर ढोणे,विजय चांदणे, विलास बामणे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवर म्हणाले की, बीड शहरामध्ये महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करुन देईल असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने या वर्षी देखील जयंती

पान २ वर...




## भव्य पुतळा लवकरच ऊभा करणार

राजाभाऊ फड : भगवान बाबा चौकात नामफलकाचे पुजन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीयसंत भगवान बाबा यांच्या १२८ व्या जयंती निमित्ताने युवानेते राजाभाऊ फड यांनी त्यांच्या संपर्क कार्यालय व परळी येथील संत भगवान बाबा चौकात नामफलकाला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले राष्ट्रीयसंत भगवान बाबा चौकात बाबांचा लवकरच भव्य पुतळा हुभा करणार असल्याचे युवानेते राजाभाऊ फड यांनी सांगितले.

दरम्यान श्री.फड पुढे बोलताना म्हणाले कि,परळी शहरातील छ.शिवाजी महाराज चौक ते जिरेवाडी कडे जाण-या मार्गावर राष्ट्रीयसंत भगवान बाबा यांच्या नावाने चौक गेली कित्येक वर्षांपासून अस्तित्वात असताना परळी नगर परिषद प्रशासन असेल किंवा पालकमंत्री, आमदार किंवा कोणत्याही सामाजिक संस्था या आपल्या राष्ट्रीय संतांच्या नावाने असलेल्या चौकाचे सुशोभीकरण किंवा पुतळा करण्याचे कधी सुचत नाही. शहरात अनेक महामानवाच्या नावाने असलेले चौक सुशोभित

पान २ वर...

## वडवणीत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन!

माहिती : संघर्ष योद्धा मनोज जरांगेंच्या वाढदिवसाचा उपक्रम



वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गोर गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेली ११ महिने झालं आपल्या जीवाची परवा न करता अनेक वेळा उपोषण करुन सरकारला सळो की पळो करून सोडणारा मराठा समाजाचा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दि १ ऑगस्ट रोजी संभाजी महाराज व्यापारी संकुल बाजार तळ वडवणी येथे रेकॉर्ड ब्रेक महारक्तदान शिबीराचे आयोजन आयोजन करण्यात आले आहे व लढा दुष्काळाशी फाउंडेशन बीडच्या वतीने रक्त दात्यांना वृक्ष वाटप व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.तरी या महारक्तदान शिबिरा मध्ये सर्व समाज बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

ऊसतोड शेतकरी,शेत मजूर,कष्टकरी गोर गरीब वंचित मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांनी हा मराठा समाजाच्या आरक्षणाचा मोठा लढा उभारला आहे.त्यांनी समाजाला मायबाप मानले आहे.समाजानेही त्यांच्या हाकेला ओ देत त्यांना दैवत मानत त्यांनी दिलेला शब्द खाली पडु दिलेला नाही.आरक्षण तर घेणारच ओबीसीतूनच घेणार असा चंग त्यांनी बांधला आहे. त्यासाठी वाटेल ते करायला ते तयार आहेत.समाजानेही त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले आहे. आपल्या दैवताचा वाढदिवसाची सर्वांना उत्स्फूर्तता लागली आहे. गुरुवार दि १ ऑगस्ट रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान हे जीवनदान समजून रेकॉर्ड ब्रेक महारक्तदान करण्याचे सर्व समाज बांधवांनी ठरवले आहे.संभाजी महाराज व्यापारी संकुल बाजार तळ वडवणी येथे सकाळी १० वाजे पासुन रक्तदानाला सुरुवात होणार आहे. लढा दुष्काळाशी फाउंडेशन बीड च्या वतीने जेवढे बांधव रक्तदान करणार आहेत त्यांना वृक्ष वाटप व प्रमाणपत्र

पान २ वर...

## नगरमध्ये उद्या आरक्षण बचाव यात्रा

लक्ष : प्रकाश आंबेडकर कुणावर साधणार निशाणा?



अप्पासाहेब मकासरे /नगर

महाराष्ट्रात सर्वाधिक चर्चेत असलेली आरक्षण बचाव यात्रा उद्या ऐतिहासिक अहमदनगर शहरात दाखल होत असुन अँड प्रकाश आंबेडकर यांच्या उद्याच्या भाषणातून कोणाला फटकारतात याची उत्सुकता लागून आहे.

महाराष्ट्रात सध्या आरक्षणावरुन शीतयुद्ध पेटल्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती कमी करण्यासाठीच वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अँड प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी आरक्षण बचाव यात्रेची सुरुवात चैत्यभूमी दादर इथून केले असून उद्या ही यात्रा ऐतिहासिक अहमदनगर शहरांमध्ये प्रवेश करणार आहे ३०जुलैला मंगळवारी संध्याकाळी ७ वा राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थळ असलेल्या ऐतिहासिक चोंडी येथे येणार असुन राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करुन ही यात्रा पुढे आष्टी येथे मुक्काम आहे ३१जुलैला बुधवारी सकाळी मढी येथुन ११:३० पाथर्डी मार्ग भगवान गड येथील संत भगवानबाबा स्मृती स्थळाचे दर्शन घेऊन पुढे बीड कडे रवाना

पान २ वर...

## आ.पंकजा मुंडेंची जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्री

अभिनंदनिय : बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना क्रेनवरुन पुष्पवृष्टी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचं विधानपरिषदेच्या आमदार झाल्यानंतर पहिल्यांदाच बीड व परळी शहरात आगमन झालं, त्यांनी हार तुरे नाकारले असले तरी त्यांचं जिल्ह्यात दिमाखदार स्वागत झालं. धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगडावर फटाक्यांच्या आतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आलं. बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर त्यांनी पुष्पवृष्टी केली. गोपीनाथ गडावर पित्याच्या चरणी त्या नतमस्तक झाल्या तर परळीत डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास त्यांनी वंदन केले. एकूणच जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्रीने त्यांनी केलेल्या सोशल इंजिनिअरिंगचं कौतुक होत आहे.



### छत्रपतींच्या पुतळ्यावर क्रेनने पुष्पवृष्टी

पंकजाताई मुंडे यांची बीड शहरात जोरदार एन्ट्री झाली. कार्यकर्त्यांनी वाजतगाजत त्यांचं भव्य स्वागत केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास त्यांनी स्वतः क्रेनच्या बास्केटमधे चढून पुष्पवृष्टी करत अभिवादन केले. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी भगवान भक्तीगडावर राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यानंतर त्यांनी थेट धाकटी पंढरी म्हणून

पान २ वर...

## नेवासा येथील नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी

उत्कर्षा रुपवते : नेवासा अग्नी तांडव प्रकरण



नेवासा/पुण्यभूमी प्रतिनिधी नेवासा शहरातील नगर पंचायत चौकातील बाजारपेठेतील १५ते१६ व्यापारी दुकानाला आग लागून मोठे अग्नी तांडव झाले यात व्यापारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे हे व्यापारी मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत सापडले आहेत त्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या अशी मागणी वंचित चे राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी केली आहे

नेवासा येथील घटनास्थळी भेट दिली असता अनेक व्यापारी बांधवांनी आपल्या व्यथा त्यांच्यासमोर मांडल्या अनेक व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून त्यांची कौटुंबिक घडी विस्कटली आहे अनेक दुकानातील सामानाची अग्नी तांडव मध्ये बेचिराख झाले आहे महसूल विभागाने त्वरित व्यापारी बंधूंना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी उत्कर्षाताई रुपवते यांनी केली.यावेळी त्यांच्या समवेत वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे युवक तालुकाध्यक्ष संतोष कसोदे रंजन दादा जाधव

पान २ वर...

## दिव्यांगांना संधी मिळणे गरजेचे!

अमरसिंह पंडित:गेवराईत दिव्यांग शिबीराला प्रतिसाद



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिव्यांग बंधू भगिनींच्या बाबतीत नुसती सहानुभूती दाखवून उपयोग नाही तर त्यांच्या क्षमता ओळखून त्यांना संधी दिली तर ते सक्षमपणे काम करतील, त्यासाठीच शारदा प्रतिष्ठान आणि साधु वासवाणी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करून दिव्यांग बांधवांना संधी देण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवाणी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई शहरात मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित साधु वासवाणी मिशनचे प्रोजेक्ट हेड मिलींद जाधव, डॉ. सुशिल ढगे, डॉ. सलील जैन, प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, सभापती मुजीब पठाण, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जगन काळे, जगन्नाथ शिंदे, बाबुराव काकडे, रिपाईचे किशोर कांडेकर, सावता परिषदेचे

पान २ वर...

## केज-कानडी रस्त्याचे काम कासवगतीने

समस्या : दुचाकीचा प्रवास धोक्याचा तर बस सेवाही बंद!



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज ते कानडी माळी या रस्त्याचे काम सध्या सुरू आहे, परंतु अत्यंत कासव गतीने हे काम सुरू आहे यामुळे वाहन चालक यांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. त्यांच्या जिवाला यामुळे धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन संबंधित गुत्तेदारास सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्याच्या सुचना द्याव्यात असी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या केज तालुका अध्यक्ष तस्लिम इनामदार यांनी केली आहे.केज पासून काही अंतरावर कानडी रोड दुरुस्तीच्या नावाखाली खोदून टाकला आहे. त्यातच सध्या पाऊस सुरू असल्याने या रस्त्यावरुन ये जा करताना वाहनधारकांना प्रचंड कसरत करावी लागते आहे. जीव मुठीत

पान २ वर...

दिलासा | खा.बजरंग सोनवणे यांनी जाणून घेतल्या अडीअडचणी

## पवनसुत निवासस्थानी भरवला जनता दरबार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासकिय कार्यालयात चकरा मारूनही काम होत नाही. ज्यांची कोणी दखलही घेत नाही, अशा गरजवंतांना खा.बजरंग सोनवणेंच्या रूपाने वाली भेटला आहे. रविवारी खा.बजरंग सोनवणे यांनी पवनसुत निवासस्थानी जनता दरबाराचे आयोजन केले होते. पहिल्याच जनता दरबारात नागरिकांच्या रांगा लागल्या. यावेळी अडलेली आणि राजकीय द्वेषातून अडवलेली कामे मार्गी लावण्यासाठी जनता दरबारातून अधिकाऱ्यांचे फोन खणखणले.खा.बजरंग सोनवणे यांनी निवडून आल्यानंतर प्रशासकिय पातळीवर महामॅरोथॉन बैठका घेवून प्रलंबित कामांचा आढावा घेतला. रेल्वेसारख्या महत्वाच्या प्रश्नावर शपथ घेण्याआधी बैठक घेवून या प्रकल्पाची काय स्थिती आहे, हे जाणून घेतले. यानंतर त्यांनी दिल्लीत जाऊन शपथ घेतली. दरम्यान, आता दिल्लीतून परतल्यानंतर विविध तालुक्यांच्या ठिकाणी जाऊन अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला जात आहे.शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा मेळावा आटपून ते रात्री उशीरा केजमध्ये पोहचले. यानंतर त्यांनी सुर्योदय होण्याच्या वेळीच आज जनता दरबार असल्याचे केजमध्ये कळविले. सकाळी ९ वाजता जनता दरबारला सुरूवात झाली. तर सायंकाळी ४.३० पर्यंत हा जनता दरबार सुरू होता. यावेळी नागरिकांनी आपले प्रश्न घेवून अक्षरश: रांग लावली होती. यात महावितरणकडून अडवणूक होत असल्याचे गाऱ्हाणे सर्वाधिक नागरिकांचे होते. त्याच बरोबर पिण्याच्या पाण्याचे प्रश्न आणि शाळांसाठी येणाऱ्या अडचणीही नागरिकांनी मांडल्या. खा.बजरंग सोनवणे यांनी प्रश्न घेवून आलेल्या नागरिकांचे जागीच समाधान करण्याचा प्रयत्न केला. रविवारची सुट्टी असतानाही संबधित अधिकाऱ्यांना फोन लावून दोन दिवसात कामे मार्गी लावण्याच्या सुचना दिल्या. शिवाय आलेल्या

पान २ वर...

## संत सावता महाराज मंदिरात सप्ताह!

अध्यात्मिक: कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे ग्रामस्थांचे आवाहन



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे श्री संतश्रेष्ठ शिरोमणी सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास काल रविवारी (दि.२८) प्रारंभ झाला असून, दिंद्रुड सह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सप्ताहातील सात दिवस हरिकीर्तन व विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

श्री संतश्रेष्ठ शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त दिंद्रुड येथील संत सावता महाराज मंदिरात यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहाला काल रविवारी प्रारंभ करण्यात आला आहे. पहाटे ४ ते ६ काकडा आरती व भजन, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, श्री संत सावता महाराज चरित्र, दुपारी २ ते ५ रामकथा, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर जागर असे कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात रविवार दि.२८ जुलै रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज हारकळ यांचे हरि किर्तन संपन्न झाले असून, दि.२९ रोजी ह.भ.प. नागनाथ महाराज पारेकर, दि ३० ह.भ.प. रोहिणी ठोंबरे, दि.३१ ह.भ.प. विष्णु महाराज रासवे, दि ०१ रोजी ह.भ.प. बाबासाहेब महाराज मुंडे, दि ०२ रोजी मारोती

पान २ वर...